# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना

अ) नियम व अटी

१. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने मागील लगतच्या परीक्षेत किमान ७०% गुण संपादित केलेले असावेत.

२. सर्व अव्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची नोंदणी नसावी.

३. पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या जास्तीत जास्त ८०० आणि पदवी अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त १२०० विद्यार्थ्यांचे अर्ज शिष्यवृत्तीसाठी विचारात घेतले जातील.

४. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. १८,०००/— व पदवी अभ्यासक्रमासाठी रु. १२,०००/— शिष्यवृत्ती देण्यात येईल.

५. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता २५ पेक्षा जास्त नसावे.

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक राहील, या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

७. महाविद्यालय/ विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थ्याने त्याच्या बॅंक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅंकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)

१०. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक राहील.

११. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त असावेत.

१२. विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅंक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅंकेस देण्यात यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग